# रत्नागिरीत सुरू झालेली शैक्षणिक ग्रामसभा चळवळ

जुलै २०२३मध्ये ग्यानप्रकाश फाऊंडेशनने रत्नागिरी जिल्ह्यात कामाला सुरुवात केली. सुरुवातीला रत्नागिरी, चिपळूण, मंडणगड, संगमेश्वर आणि दापोली या पाच मुख्य तालुक्यांवर लक्ष केंद्रित करण्यात आले. या काळात तालुकास्तरीय नियोजन करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या तालुका गुणवत्ता कक्षांची लक्षणीय अनुपस्थिति दिसून आली. तसेच डेटा आधारित नियोजन होत नसल्याचेही लक्षात आले. शिक्षण परिषदा अनियमित होत्या आणि केंद्र संसाधन गट तयार झालेले नसल्याने गुणवत्तापूर्णही होत नव्हत्या. तसेच शाळा व्यवस्थापन समिती पुनर्गठन प्रक्रिया सुरळीत नव्हती.

या समस्यांवर उपाय म्हणून शैक्षणिक प्रक्रिया नियमित होण्याकरता सर्व व्यवस्थेमध्ये एकवाक्यता आणणे गरजेचे होते. ग्यानप्रकाश फाऊंडेशनने केंद्रप्रमुख बैठका आणि शिक्षण परिषदांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. तसेच शाळाभेटीही केल्या. त्यामध्ये जिल्हा परिषद शाळांमधली पटसंख्या कमी होत असल्याचे दिसून आले. ही बाब बरीच काळजीची होती. विद्यार्थी संख्या वाढावी आणि शिक्षणाचा दर्जा सुधारावा यासाठी या शाळांमध्ये पायाभूत सुविधांची गरज असल्याचे लक्षात आले. त्यासाठी समुदायाचा सहभाग मिळवणे महत्त्वाचे असल्याचे स्पष्ट झाले.

शाळांमध्ये आवश्यक सुविधा तयार करण्यासाठी गावाची मदत घेता यावी यासाठी शैक्षणिक ग्रामसभा (EGS) ही प्रक्रिया महत्त्वाची ठरते. मुलांमध्ये क्षमता विकास घडवून आणण्यासाठी समुदायाचा सक्रिय सहभाग महत्त्वाची भूमिका बजावताना दिसतो. गुणवत्तापूर्ण शिक्षणामध्ये ग्रामपंचायतीची भूमिका महत्त्वाची असल्याचे लक्षात घेत प्रभावी EGS साठी सबंध जिल्ह्यात एक सर्वंकष कार्यशाळा घेण्याचे ठरले. रत्नागिरी जिल्हा परिषद आणि ग्यान प्रकाश फाऊंडेशन यांनी संयुक्तपणे घेतलेल्या या कार्यशाळेत वर दिलेल्या आव्हानांची दखल घेण्याचे ठरले.

डिसेंबर २०२३मध्ये गटविकास अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली आणि गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाने तालुकास्तरीय कार्यशाळा घेण्यात आल्या. त्यामध्ये सरपंच, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, विकास अधिकारी, एकात्मिक बालविकास सेवा योजना पर्यवेक्षक, आणि इतर भागधारक सहभागी झाले. शाळा विकास आराखडा तयार करणे, शाळेच्या गरजा ओळखून त्यांचे प्राधान्यक्रम ठरवणे आणि शाळा व्यवस्थापन समितीच्या बैठकांसारख्या महत्वाच्या प्रक्रियांचे नियोजन करणे अशा महत्त्वाच्या घटकांचा या कार्यशाळेत समावेश होता. ग्रामसभेची तयारी, बैठकीदरम्यान आणि नंतर करायची आवश्यक कामे यासारख्या मुद्द्यांवरही चर्चा झाली.



या कार्यशाळांमुळे बदलांना लक्षणीय चालना मिळालेली दिसून आली. जानेवारी २०२४मध्ये शाळा व्यवस्थापन समिती बैठका, बालसभा आणि शैक्षणिक ग्रामसभा यांचे नियोजन करावे असे जिल्हापातळीवर आदेश काढण्यात आले. यापूर्वी जिल्ह्यामध्ये नियमित शैक्षणिक ग्रामसभा होताना दिसून आल्या नव्हत्या. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षांच्या आणि मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली शाळा व्यवस्थापन समिती बैठका आणि बालसभा घेण्यात आल्या. या बैठकांमध्ये शाळेच्या गरजा काय आहेत हे समजून घेण्यात आले. त्यानंतर झालेल्या शैक्षणिक ग्रामसभांमध्ये या गरजांवर काय उपाय करता येईल याविषयी चर्चा करून, धोरण ठरवण्यासाठी चांगले व्यासपीठ मिळाले.





आपल्या हद्दीतील प्रत्येक शाळेच्या गरजांवर उपाय शोधण्याची जबाबदारी ग्रामपंचायतींनी घेतली. जिल्हा स्तरीय नियोजनाशी जुळणारे शाळा विकास आराखडे तयार करण्यात आले. ग्रामसभेने या आराखड्यांना मंजुरी दिली. जानेवारी महिन्याच्या अखेरीस विविध तालुक्यांमध्ये मिळून एकूण ५०८ शैक्षणिक ग्रामसभा पार पडल्या. त्यामध्ये लांजा, राजापूर, रत्नागिरी, संगमेश्वर, चिपळूण, खेड, दापोली, मंडणगड आणि गुहागर या तालुक्यांचा समावेश होता.

दिनांक ११ ते १३ जानेवारी या काळात रत्नागिरी जिल्ह्याने मैलाचा दगड गाठला असे म्हणावे लागेल. एकूण ४८२ ग्रामपंचायतींमध्ये शैक्षणिक ग्रामसभा झाल्या. सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, मुख्याध्यापक, शिक्षक, पालक आणि ग्यान प्रकाश फाऊंडेशनचे प्रतिनिधी या सर्व भागधारकांनी त्यामध्ये सक्रीय सहभाग घेतला. मुलांमधील कौशल्य विकास, शाळांमधील भौतिक सुविधांचा विकास, शैक्षणिक साहित्याची उपलब्धता, शाळांमधील दुरुस्त्या, वृक्षारोपण आणि स्वच्छता कार्यक्रम, ई-लर्निंग, ग्रंथालये स्थापणे, आणि अभ्यास गट तयार करणे यासारखे महत्त्वाचे मुद्दे या सत्रांमध्ये पुढे आले. यातून शाळांमध्ये आणि शैक्षणिक प्रक्रियांमध्ये समुदायाचा सहभाग निश्चित वाढला.

यानंतर चार महिन्यांनी फॉलो-अप ग्रामसभांचे आयोजन करणे ही पुढची पायरी असेल. तोपर्यंत या शैक्षणिक ग्रामसभेत घेतलेल्या निर्णयांसाठी नियोजन करणे आणि त्यांची प्रभावी अंमलबजावणी होत आहे याकडे लक्ष देणे यांवर मुख्य भर दिला जाईल. जिल्हा समन्वय बैठका, जिल्हा आणि तालुका गुणवत्ता कक्ष बैठका, पंचायत समिती बैठका, आणि ग्राम पंचयातीच्या मासिक सभा अशा सर्व स्तरांवर याकडे लक्ष दिले जाईल. याशिवाय, विविध विभागांसोबत समन्वय साधून घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी होते आहे ना हे बघितले जाईल. सबंध यंत्रणेला या फॉलो-अपमध्ये सहभागी करून घेणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे या प्रक्रिया शाश्वत होण्यास मदत होईल.




©: ग्यान प्रकाश फाऊंडेशन